बाब विचारात घेऊन पुन: खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१] बसस्थानकावरील प्रसाधन गृहे, संडास, मुता-या, उपहारगृहे व बसस्थानकावरील आजूबाजूचा परिसर इत्यादी साफ करून घेण्याची जबाबदारी विभागीय अभियंता, स्थानक प्रमुख, प्रवासी सुविधा निरीक्षक यांची राहील. त्याप्रमाणे ब-याच स्थानकावर सुलभ शौचालये पुरविण्यात आलेली आहेत व त्यामुळे सफाईगाराची पदे अतिरिक्त झालेली आहेत. तेव्हा विभागातील इतर ठिकाणची निकड [आवश्यकता] लक्षात घेऊन असे अतिरिक्त ठरलेले सफाईगार त्या ठिकाणी नेमावेत. विभागीय अभियंता हे साफ-सफाई करण्यासाठी जे काही आवश्यक सामान लागणार असेल ते पुरवतील.

२] ज्या ठिकाणी सफाईगार कर्मचारी नाहीत तसेच नेमणूक केलेला सफाईगार कर्मचारी गैरहजर राहिल्याने त्याची सेवा उपलब्ध होत नसेल अशा वेळी आगार व्यवस्थापक यांनी या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एस/आस्था/४०८-ई/२२२६ दि. १२.७.१९९५ अनुसार देण्यात आलेल्या अधिकारानुसार त्याचा वापर करून बसस्थानक स्वच्छ राहील हे पहावे, आणि त्यासाठी रु. २०/- ते २५/- पर्यन्त खर्च आगाराने करावा. असा स्वच्छतेसाठी करण्यात आलेला खर्च वेळो वेळी म्हणून वाहतूक नियंत्रक / स्थानक प्रमुख यांनी प्रमाणित केल्यानुसार आगार व्यवस्थापकांनी मंजूर करावा.

३] स्वच्छतेचा उत्तम दर्जा ठेवण्यासाठी जबाबदारी विभागीय अभियंता यांची राहील. बसस्थानकाच्या आवारात साचलेला केरकचरा/घाण वगैरे विल्हेवाट लावण्याची जबाबदारी देखिल विभागीय अभियंता यांची राहील.

४] विभागीय अभियंता हे त्यांच्या कार्यकारी नियंत्रणाखाली असलेल्या कनिष्ठ अभियंता यांना विभागातील कामाचे वाटप करून देतील व त्यानुसार बसस्थानके, बसस्थानकाच्या स्वच्छतेची जबाबदारी त्यांचेवर टाकतील. त्याबाबतची अंमलबजावणी करून घेण्यासाठी ते जबाबदार राहतील.

५] महामंडळाने प्रवासी सुविधा करिता विशेषत: प्रवाशांचे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उपहारगृहे, स्वच्छतागृहे, बस गाड्यांची स्वच्छता इत्यादी प्रवासी सुविधा पुरविण्याकडे योग्य ते लक्ष देण्यासाठी प्रत्येक विभागासाठी प्रवासी सुविधा निरीक्षक असे पद निर्माण केलेले आहे व त्याबाबतच्या सूचना या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एसटी/ईसटी/६०२-जीई/७३३९ दिनांक ६.९.१९७९ अन्वये दिलेले आहेत. या सूचनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करून घेण्यासाठी कार्यकारी अभियंता हे जबाबदार राहतील.

६] विभागीय पातळीवर स्वच्छता ठेवण्याबाबतचा कार्यक्रम विभागीय अभियंता, कनिष्ठ अभियंता यांना आखून देतील.

७] नियुक्त केलेल्या सफाईगारामधून ज्या ठिकाणी संख्या ४० व त्यापेक्षा जास्त आहे अशा पैकी एका सफाईगाराची जो इतरांवर कार्यक्षमतेने नियंत्रण ठेवू शकतो व इतरांकडून काम करून घेऊ शकतो अशाची मुकादम म्हणून बसस्थानक प्रमुख यांनी निवड करावी व त्याच्या नियंत्रणाखाली स्वच्छतेचे काम सोपवावे.

८] बसस्थानक परिसरातील खड्डे बुजविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी विभागीय अभियंता यांची राहील.

..३..